ePaper

**जयंत पाटलांना दे धक्का, भाऊच भाजपात; राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत मोठ्या नेत्यांचीही बीजेपीत एंट्री**



| वर्ष - 8 | अंक - 260 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 16 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- चिंधड्या विसरून पंजाबची कमाल!
- रोहितला वानखेडेमध्ये हक्काचं स्थान!
- रॉबर्ड वाड्राची ईडीकडून चौकशी!
- दंगेखोरांना समजुतीची भाषा कळत नाही

### सहारा उद्योग समूहा' च्या वसुलीपोटी 1,460 कोटीच्या जप्तीची कारवाई

# लोणावळ्यातील 'ॲम्बी व्हॅली' ची 707 एकर जमीन 'ईडी' कडून जप्त

### 'सहारा उद्योग समूहा' ने फसवलेल्या हजारो ग्राहकांकडून 500 पेक्षा जास्त गुन्हे दाखल...

। लोणावळा / मुंबई / महाईन्यूज । प्रतिनिधी । महाईन्यूज

**दिवंगत उद्योगपती सुब्रत रॉय यांनी 'सहारा उद्योग समूहा' च्या माध्यमातून खास श्रीमंतांसाठी उभ्या केलेल्या 'ॲम्बी व्हॅली' ची ७०७ एकर जमीन मंगळवारी जप्त करण्याची कारवाई 'ईडी' ने केली. या माध्यमातून सुमारे १,४६० कोटी रुपयांची वसुली झाली आहे. सहारा समूहाकडून फसवणूक झालेल्या हजारो ग्राहकांकडून ५०० पेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले आहेत. दरम्यान, या उद्योग समूहाचे प्रमुख उद्योगपती सुब्रत रॉय यांचे १४ नोव्हेंबर २०२३ रोजी ७५ व्या वर्षी निधन झाले.**



#### 'सहारा उद्योग समूह आणि उद्योगपती सुब्रत रॉय..'

सहारा इंडिया परिवाराची स्थापना १९७८ मध्ये सुब्रत रॉय यांनी केली. हा समूह विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत होता. वित्त, रिअल इस्टेट, क्रीडा, वीज, उत्पादन, मीडिया, मनोरंजन, आरोग्य सेवा, जीवन विमा, शिक्षण, रिटेल आणि ई-कॉमर्स यांचा त्यात समावेश आहे. जगातील सर्वात मोठे कुटुंब असा हा परिवार मानला जायचा. या परिवारात नऊ कोटींहून अधिक गुंतवणूकदार आणि ग्राहक होते. सुब्रत रॉय यांनी आपल्या राजकीय भूमिकेबद्दल उघडपणे बोलले होते, आणि त्यांनी विविध राजकीय पक्षांशी संबंध ठेवले होते. त्यांनी सुरू केलेली सहारा विमान कंपनी खूपच लोकप्रिय ठरली त्याचप्रमाणे त्यांची विविध भाषांमध्ये सहारा इंडिया ही न्यूज चॅनल्सही लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली.

#### 'ईडी' ची कारवाई आणि खुलासा...

गेली काही वर्षे 'सहारा उद्योग समूहा' च्या पाठीमागे ईडीचा ससेमिरा लागला होता. श्रीमंतांकडून करोडो रुपयांच्या रकमा घेऊन लोणावळ्याजवळ खास 'ॲम्बी व्हॅली' वसविण्यात आली होती.

#### आलिशान बंगले, प्रचंड सोयी सुविधा..

या व्हॅलीमध्ये बांधण्यात आलेल्या आलिशान बंगल्यांमध्ये प्रचंड सोयी-सुविधा पुरवण्यात आल्या होत्या. तेथे येणाऱ्या पर्यटकांना क्षणभर असे वाटून जायचे, की आपण भारतात आहोत का परदेशात? पण, कालांतराने सहारा उद्योग समूहाने हा पैसा दुसरीकडे आणि अन्य कंपन्यांचा पैसा या ठिकाणी वळवल्यामुळे मनी लॉन्डरिंगचा खटला सुरू झाला.

#### सुब्रत रॉय अटकेत... नंतर निधन

या संपूर्ण प्रकल्पाचे प्रवक्ते सुब्रत रॉय यांना नंतर या प्रकरणात अटक झाली आणि कारागृहातून जनतेचे पैसे देण्यासाठी त्यांनी बराच खटाटोप केला. त्यांनी एकूण सुमारे १५ हजार कोटी पेक्षा जास्त रकमेचा घोटाळा केला असल्याचे उघड झाले आणि शेवटी त्यांच्या मागे ईडीचा ससेमिरा लागला. त्यामध्ये त्यांचे शेवटी निधन झाले आणि देशभरातील गुंतवणूकदार अडकले.

#### बेहिशेबी पैशाचा बेसुमार वापर...

'पी एम एल ए' या कायद्यानुसार ईडीने स्पष्ट केले आहे, की या महाकाय प्रकल्पासाठी बेहिशेबी आणि फिरवा फिरवी केलेल्या पैशाचा बेसुमार वापर केला गेला. सहारा उद्योग समूहाच्या विविध बेनामी संपत्तीमधून ही जमीन विकत घेतली गेली. ठराविक नावांवर नसलेली ही जमीन खरेदी करण्यासाठी अन्य अनेक कंपन्यांमधून पैसे काढले गेले किंवा फिरवले गेले.

#### गुंतवणूकदारांना मोठा धोका..

या जमीन खरेदीसाठी इतर कंपन्यांचा पैसा वापरणे म्हणजे त्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना मोठा धोका दिला गेला असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. ओडिशा, बिहार, राजस्थान पोलिसांकडून 'मेसर्स हमारा इंडिया क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' या संस्थेविरुद्ध तीन एफ आय आर नोंदविण्यात आल्या आणि त्या आधारे सुरुवातीला चौकशी सुरू झाली. अनेक गुंतवणूकदारांवर जबरदस्ती देखील करण्यात आली होती, आणि त्यांना योग्य परतावा मात्र मिळालेला नाही, असे सांगण्यात येते.

#### यापूर्वी, नेमके काय घडले?

गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी सुमारे चार-पाच वर्षांपूर्वी लिलाव पुकारण्यात आलेल्या 'सहारा उद्योग समूहा' च्या पुणे जिल्ह्यातील ॲम्बी व्हॅलीचा ताबा मुंबई उच्च न्यायालयाच्या 'ऑफिशियल लिक्विडेटर' कडे दिला जाईल याची महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकांनी खात्री करावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार 'ऑफिशियल लिक्विडेटर' ॲम्बी व्हॅलीच्या लिलावाचे काम करीत होते. सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्या. रंजन गोगोई व न्या. ए. के. सिक्री यांच्या खंडपीठापुढे हे प्रकरण पुढील सुनावणीसाठी आले तेव्हा 'सेबी'तर्फे ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी असे निदर्शनास आणले की, सहारा समूहाने आधीच्या आदेशानुसार ॲम्बी व्हॅलीचा ताबा 'ऑफिशियल लिक्विडेटर' कडे न देता पुणे ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांना पत्र लिहून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश!

## मोफत गणवेश योजनेसाठी 248 कोटी रुपये मंजूर

। पुणे ।महाईन्यूज। प्रतिनिधी।

**राज्य सरकारच्या मोफत गणवेश योजनेअंतर्गत राज्यातील पात्र विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी २४८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम मंजूर करण्यात आली असून, मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीद्वारे केली जाणार आहे.**



गेल्यावर्षी एक राज्य एक गणवेश योजनेअंतर्गत मोफत गणवेश योजनेचे केंद्रीकरण करण्यात आले होते. मात्र, त्यात प्रचंड गोंधळ झाले.

विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, मापाचे गणवेश न मिळणे, फाटके गणवेश मिळणे असे प्रकार उघडकीस आले. त्यामुळे या योजनेला राज्यभरातून विरोध करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर, शालेय शिक्षण विभागाने एक राज्य एक गणवेश योजना रद्द करून पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीच्या स्तरावर गणवेश वाटप, गणवेशाचा रंग ठरवण्याचे अधिकार दिले. या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव यांनी योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

केंद्र सरकारकडून मोफत गणवेश योजना अंदाजपत्रकास तत्त्वत: मंजुरी मिळाली आहे. यू-डायस प्लसमधील समग्र शिक्षा, पीएमश्री आणि राज्य गणवेश योजनेसाठी पात्र विद्यार्थी संख्या ४२ लाख ९७ हजार ७९० आहे. संबंधित विद्यार्थ्यांना दोन गणवेशांसाठी ६०० रुपये दराने १८१ कोटी ४७ लाख ९७ हजार २०० रुपये केंद्र सरकारने तत्त्वत: मंजूर केले आहेत.

राज्य शासनाच्या गणवेश योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या एकूण ११ लाख १५ हजार ७६० विद्यार्थ्यांसाठी ६०० रुपये प्रती विद्यार्थी या प्रमाणे ६६ कोटी ९४ लाख ५६ हजार रुपये आर्थिक तरतूद मंजूर आहे. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी दोन गणवेश संच गणवेश पात्र विद्यार्थ्यांना वितरित करण्यात यावेत. पहिली ते आठवीतील सर्व मुली, अनुसूचित जाती मुले, अनुसूचित जमाती मुले, तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना लागू आहे. तसेच सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून दारिद्र्यरेषेवरील पालकांच्या मुलांनाही गणवेश तसेच एक जोडी बूट, दोन जोडी पायमोजे यांचा लाभ देण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. पहिलीच्या वर्गात प्रवेशित विद्यार्थी, तसेच शाळेत नव्याने प्रवेश घेतलेले पात्र विद्यार्थ्यांना दोन गणवेशांचे वाटप करावे. पात्र विद्यार्थी गणवेशापासून वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.स्काऊट गाईड विषय असलेल्या शाळांनी एका गणवेशाची रंगसंगती शाळा स्तरावर निश्चित करून दुसरा गणवेश स्काऊट-गाइड संस्थेने निश्चित केलेल्या रंगसंगतीप्रमाणे खरेदी करावा. गणवेशाचे कापड चांगल्या दर्जाचे, विद्यार्थ्यांच्या शरीराला, त्वचेला इजा न करणारे असल्याची दक्षता घ्यावी. कापड १०० टक्के पॉलिस्टर नसावे.

शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी शाळास्तरावर वाटप केलेल्या गणवेशाची तपासणी करावी. गणवेशासंदर्भात तक्रार उपस्थित झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीची असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विभाग, अल्पसंख्याक विभागामार्फत गणवेश अथवा शासनमान्य वसतिगृहातील विद्यार्थ्यांना गणवेशाचा लाभ दिला जात असल्यास अशा लाभार्थ्यांना समग्र शिक्षा अंतर्गत गणवेश योजनेचा लाभ देऊ नये. एकाच विद्यार्थ्यास दुबार गणेशाचा लाभ देता येणार नाही. ज्या महानगरपालिकांकडून त्यांच्या स्वनिधीमधून विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात येतो, त्या विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा अंतर्गत गणवेशाचा दुबार लाभ देण्यात येऊ नये, असेही नमूद करण्यात आले आहे.

### एक राज्य एक गणवेश योजना रद्द

गेल्यावर्षी एक राज्य एक गणवेश योजनेअंतर्गत मोफत गणवेश योजनेचे केंद्रीकरण करण्यात आले होते. मात्र, त्यात प्रचंड गोंधळ झाले. या पार्श्वभूमीवर, शालेय शिक्षण विभागाने एक राज्य एक गणवेश योजना रद्द करून पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीच्या स्तरावर गणवेश वाटप, गणवेशाचा रंग ठरवण्याचे अधिकार दिले.

# मुंढवा चौकात प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदल

## सिग्नल बंद केल्याने वाहतूक गतिमान होण्यास मदत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंढवा चौकात होणारी वाहतूककोंडी दूर करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी या भागात प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदल केले आहेत. या चौकातील सिग्नल बंद केल्याने वाहतूक गतिमान होण्यास मदत होणार आहे.**



मुंढवा चौक गजबजलेला चौक आहे. खराडी आयटी पार्क, तसेच मगरपट्टा आयटी पार्ककडे जाणारी वाहने, तसेच नगर, सोलापूर रस्त्याकडे जाणारी वाहने या मार्गाचा वापर करतात. या चौकातील सिग्नलमुळे वाहतूक विस्कळीत होऊन कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले होते. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त अमोल झेंडे यांनी या चौकाची पाहणी केली होती. या चौकातील वाहतूक गतिमान करण्यासाठी मुंढवा चौकातील सिग्नल बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या भागातील वाहतूक गतिमान करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक बदल करण्यात आल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली.मुंढवा चौकातून खराडी, हडपसरकडे जाणारी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी घोरपडीतून केशवनगरहून मांजरी, हडपसरकडे जाणाऱ्या वाहनांनी मुंढवा चौकातून डावीकडे जावे. तेथून मुंढवा येथून उजवीकडे वळून (यू टर्न) घेऊन इच्छितस्थळी जावे. बस, टेम्पोसह अन्य चारचाकी वाहनांनी यू टर्न न घेता साईनाथनगरकडे जावे. तेथून यू टर्न घेऊन इच्छितस्थळी जावे, असे आवाहन करण्यात आले आहे. केशवनगरकडून खराडी, कोरेगाव पार्ककडे जाणाऱ्या वाहनांनी मुंढवा चौकातून डाव्या बाजूने जावे. मुंढवा रेल्वे उड्डाणपूल येथून उजवीकडे वळून (यू टर्न) इच्छितस्थळी जावे. बस, टेम्पोसह अन्य चारचाकी वाहनांनी भुयारी मार्ग (अंडरपास) न वळता रेल्वे उड्डाणपुलाकडून उजवीकडे वळून इच्छितस्थळी जावे.मुंढवा चौक गजबजलेला चौक आहे. खराडी आयटी पार्क, तसेच मगरपट्टा आयटी पार्ककडे जाणारी वाहने, तसेच नगर, सोलापूर रस्त्याकडे जाणारी वाहने या मार्गाचा वापर करतात.

### चौकातील सिग्नल बंद

मुंढवा चौक गजबजलेला चौक आहे. खराडी आयटी पार्क, तसेच मगरपट्टा आयटी पार्ककडे जाणारी वाहने, तसेच नगर, सोलापूर रस्त्याकडे जाणारी वाहने या मार्गाचा वापर करतात. या चौकातील सिग्नलमुळे वाहतूक विस्कळीत होऊन कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले होते. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त अमोल झेंडे यांनी या चौकाची पाहणी केली होती.

### वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरु

# पिंपरी चिंचवड भाजप शहराध्यक्ष बदलणार!

## अध्यक्षपदाच्या शर्यतीत विलास मडिगेरी, शत्रुघ्न काटे 'डार्क हॉर्स '?

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील सत्ताधारी भारतीय जनता पार्टीकडून पिंपरी-चिंचवडमध्ये "भाकरी फिरवण्याची" तयारी सुरू झाली आहे. पक्षामध्ये संघटनात्मक बदल करण्यात येणार असून, चिंचवड मतदार संघातील माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे आणि भोसरी मतदार संघातील विलास मडिगेरी यांच्यापैकी एकाला शहराध्यक्षपदाची जबाबदारी मिळण्याची दाट शक्यता आहे.**



चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या शहराध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला असून, भाजपाकडून संघटनात्मक निवडणूक प्रक्रिया काही दिवसांपूर्वीच सुरू केली आहे. प्रदेश पातळीवर कार्यकारी प्रदेशाध्यक्ष म्हणून आमदार रविंद्र चव्हाण यांनी कार्यभार स्वीकारला. त्यानंतर प्रत्येक जिल्हा कार्यकारिणी तयार करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये एकूण 8 मंडल होते. नवीन संघटनात्मक रचनेनुसार एकूण 14 मंडलांची निर्मिती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर मंडलाध्यक्ष निवडणूक होणार आहे. तसेच, शहर कार्यकारिणीचे सरचिटणीस, उपाध्यक्ष, चिटणीस अशा विविध पदांसाठी निवडणूक कार्यक्रम निश्चित केला आहे.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी 2014 मध्ये भाजपात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली होती. त्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर 2019 मध्ये आमदार महेश लांडगे यांच्याकडे शहराध्यक्षपदची जबाबदारी देण्यात आली. जगताप यांच्या निधनानंतर पोटनिवडणूक झाली. तत्पूर्वी, शंकर जगताप यांनी शहराध्यक्ष म्हणून शहर भाजपाचा कारभार पाहिला.

आमदार रविंद्र चव्हाण यांना कार्यकारी प्रदेशाध्यक्षपदावर नियुक्ती झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहर कार्यकारी शहराध्यक्ष म्हणून माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांना जबाबदारी सोपवण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून संघटनात्मक कामकाजामध्ये काटे सक्रीय आहेत. तसेच, माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी हेसुद्धा शहराध्यक्षपदासाठी इच्छुक असल्याचे बोलले जाते.

### आमदारांमध्ये खलबते सुरु

भाजपा शहर कार्यकारिणीवर वर्चस्व ठेवण्यासाठी चिंचवड आणि भोसरी दोन्ही मतदार संघातील पक्षाच्या आमदारांमध्ये खलबते सुरू आहेत. चिंचवडच्या पोटनिवडणुकीत शत्रुघ्न काटे यांनी तिकीटासाठी मागणी केली होती. मात्र, त्यांना संघटनात्मक पद देवू असे सांगून समजूत काढल्याचे बोलले जाते. त्यानंतर पक्षश्रेष्ठींनी काटे यांना कार्यकारी शहराध्यक्षपदाची जबाबदारीही दिली आहे. त्यामुळे शत्रुघ्न काटे यांचे पारडे जड असून, शहराध्यक्षपदासाठी त्यांची वर्णी लागेल, असे चित्र आहे. मात्र, 2029 च्या विधानसभा निवडणुकीत डोकेदुखी नको, म्हणून एका गटाचा शत्रुघ्न काटे यांना सुप्त विरोध आहे. तर दुसरीकडे माजी स्थायी समिती सभापती विलास मडिगेरी यांना अप्रत्यक्ष 'सपोर्ट' मिळाला असून, निष्ठावंत गटाचा चेहरा म्हणून त्यांचे नाव पुढे करण्यात येत आहे, अशी कुजबूज शहर भाजपामध्ये ऐकायला मिळत आहे.

---

### भोसरी जलतरण तलावाला 'असुविधांच्या झळा'

## शेड, बाकडे, तसेच कपडे ठेवण्यासाठी लॉकर नसल्याने नागरिकांची गैरसोय

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**देखभाल-दुरूस्तीनंतर दीड महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या भोसरीतील कै .बाळासाहेब लांडगे जलतरण तलावात पोहण्यासाठी येणाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र, जलतरण तलावाच्या ठिकाणी सावलीसाठी नसलेले शेड, बसण्यासाठी बाकड्यांचा अभाव तसेच कपडे ठेवण्यासाठी लॉकर नसल्याने नागरिकांना गैरसोय सहन करावी लागत असल्याने भोसरी जलतरण तलावालाच भर उन्हाळ्यात 'असुविधांच्या झळा' बसत आहेत.**



महापालिकेचा भोसरी जलतरण तलाव गेल्या अनेक दिवसांपासून देखभाल - दुरुस्तीसाठी बंद ठेवण्यात आला होता. जलतरण तलाव बंद असल्याने खेळाडूंची आणि क्रीडाप्रेमींची गैरसोय होत होती. नव्याने सुशोभीकरण व रंगरंगोटी केल्यानंतर १ मार्चपासून तलाव जलतरणपटू व नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. हा तलाव ठेकेदारी पद्धतीने चालविण्यास देण्यात आला आहे. तलावावर सोयी-सुविधा पुरविण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाकडे आहे. जलतरण तलाव सुरू झाल्याने अनेकांची गैरसोय थांबली आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून भोसरीतील तलावाचे नूतनीकरण केले आहे. नव्याने स्वच्छतागृहासह स्नानगृहाचे दरवाजे, परिसराचे आकर्षक सुशोभीकरण, विद्युत दिवे, तलावाची कमी केलेली खोली, नवीन फरशा तसेच योग्य प्रकाशयोजना आणि प्रथमोपचार किटसारख्या सुरक्षा उपकरणांनी जलतरण तलाव सुसज्ज करण्यात आला आहे. गेल्या दीड महिन्यात भोसरी जलतरण तलावावर पोहण्यासाठी व प्रशिक्षणासाठी आबाल-वृद्धांची गर्दी वाढू लागली आहे. मात्र, जलतरण तलावाच्या ठिकाणी सावलीसाठी शेडची सोय करण्यात आलेली नाही. सध्या वाढत्या उन्हाच्या चटक्यांमुळे अंगाची लाहीलाही होत आहे. अशा परिस्थितीत जलतरणपटूंना दुपारच्या वेळेस उन्हाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. उन्हापासून संरक्षण मिळण्यासाठी या ठिकाणी फॅब्रिक शेड टाकण्याची मागणी केली जात आहे. तलावावर बाकडे नसल्याने प्रशिक्षणार्थींच्या पालकांना ताटकळत उभे राहण्याची वेळ येते. कपडे ठेवण्यासाठी तलावावर एकच लॉकर आहे. तेसुद्धा गंजलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे जलतरणपटूंना उघड्यावर कपडे ठेवावे लागत आहे. सध्या शाळांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या आहेत. जलतरण तलावावर आणखी वाढणारी गर्दी लक्षात घेऊन या ठिकाणी महापालिका प्रशासनाने सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली जात आहे.

> "जलतरण तलावात एकूण १३ बॅचेस आहेत. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत पास व प्रशिक्षणार्थी जलतरणपटूसाठी वेगवेगळ्या वेळेत तलाव सुरू आहे. दीड महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या या तलावावर पोहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे."
>
> –**राहुल पाटील,** (व्यवस्थापक - भोसरी जलतरण तलाव)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्संगतीच्या योगे मन पैक्यावर गुंतून राहात नाही

संतांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते; ते बोलतील ते खरे होते. वाचासिद्धी म्हणतात ती हीच. या सिद्धीचा उपयोग आपणसुद्धा करून घेऊ शकतो; परंतु भगवत्सेवा करावी आणि त्याबद्दल पगार घ्यावा, तसे हे होते. कामधेनूवर ओझे टाकावे हे बरे वाटेना म्हणून, वाटेने घोडा येत होता तो घेतला आणि कामधेनू देऊन टाकली, तशासारखे हे होते. जे सुख चिरकाल टिकणारे नाही ते घेऊन काय करायचे ? हाडांची काडे करून स्वर्गसुख हाती आले, पण कालांतराने ते नाश पावणार; मग ते घेऊन काय करायचे ? पैक्यासारख्या निर्जीव वस्तूत आपले मन किती गुंतून राहते ! पैसा हा भुतासारखा आहे; त्याच्याकडून काम करवून घेतले तर तो फार उपयोगी आहे. पण ते न केले तर तो उरावर बसतो! आपण प्रापंचिक माणसे; आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. पैशाचा आधार आहे असे वाटणे म्हणजे भगवंताचा आधार नाही असे वाटणे होय. आपल्याजवळचा पैसा आपण होऊन कुणाला द्यावा असे मी म्हणत नाही. पण चोराने तो चोरून नेला तर रडत बसू नये, किंवा कुणी मागायला आला तर त्याला 'नाही' म्हणू नये. त्याला काहीतरी द्यावेच. पैसा प्रपंचाला पुरेसा असावा. म्हणजे किती ? तर पेन्शन असेल त्यांना रोजच्या निर्वाहापुरता असला म्हणजे पुरेसा झाला; आणि पेन्शन नसेल त्यांना साधारण मध्यम स्थितीत दहा-पंधरा वर्षे पुरेल इतका असला म्हणजे पुरेसा झाला. याला अमुक एक असा हिशेब सांगता येणार नाही. आपल्या प्रपंचाला जेवढा जरूर आहे तेवढा पैसा आपल्याला मिळाला, की बस्स झाले. श्रीमंतीला पुष्कळ पैसा लागतो असे थोडेच आहे ? आपल्याला अडचण नाही पडली की आपली श्रीमंतीच आहे ! पैशाच्या बाबतीत आपण प्रयत्न मात्र आग्रहाने करावा, आणि नंतर होईल तसे होऊ द्यावे. आपण आतून निष्काम, निर्लोभ आणि निरिच्छ असावे. दुसऱ्याचे द्रव्य मला यावे अशी बुद्धी कधीही ठेवू नये. ज्याच्याजवळ पैसा विपुल आहे त्याला श्रीमंत अगर सावकार म्हणता येईल; ज्याच्याजवळ विद्वत्ता आहे त्याला विद्वान् म्हणता येईल; ज्याच्याजवळ शेत आहे त्याला शेतकरी म्हणता येईल; परंतु यांच्यापैकी कोणाला मोठा म्हणता येईलच असे नाही. सावकार कंजूष असेल, विद्वान् गर्विष्ठ असेल, किंवा शेतकरी असाच दुर्गुणी असेल. ज्याच्याजवळ सर्व गुण एकसमयावच्छेदेकरून असतील तोच खरा मोठा होय. सर्व गुण एका भगवंताच्या ठिकाणीच असू शकतील. म्हणून त्याला ज्यांनी आपलासा केला तेच खरे मोठे बनतात. अशा लोकांना संत म्हणतात. आपण संतांचे होऊन राहावे, त्यात आपले कल्याण आहे. सत्संगतीपासून सद्विचार आणि सद्भावना प्राप्त होतात. ज्याचे विचार चांगले तो मनुष्य खरा चांगला होय; आणि जिथे भगवंताचे अनुसंधान आहे तिथे राहणे हीच खरी सत्संगती होय.

**बोधवचनः- पैशाचे नाव अर्थ, पण तो करतो मोठा अनर्थ.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# चोक्सी, राणा जेरबंद, मल्याही येईल.. दाऊदचा 'करेक्ट कार्यक्रम' कधी ?

**भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर घोटाळे करून परागंदा होणाऱ्यांच्या यादीमधील मेहुल चोक्सी याला बेल्जीयम मध्ये जेरबंद करण्यात आले. त्याचा भाचा नीरव मोदी तसेच विजय मल्ल्या हे अद्याप परदेशात लपून बसले आहेत.**





### दाऊदला फरपटत कधी आणणार ?

मुंबईमध्ये २६/११ ला भयानक हिंसाचार घडवून आणून देशद्रोही कारस्थाने करणाऱ्या गँगचा मास्टर माईड तहव्वूर राणाला भारतात आणले, हे खरोखरच अभिमानास्पद आहे. सुनावणी होऊन त्याला शिक्षाही होईल, पण, सतत भारताविरुद्ध छुपे युद्ध छेडणाऱ्या कुख्यात डॉन दाऊद इब्राहिमला भारतात खरपट कधी आणणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### किती हल्ले, किती जणांना शिक्षा..

दुर्दैवाने गेल्या चाळीस वर्षात भारतात अक्षरशः शेकडो दहशतवादी हल्ले झाले आणि त्या सर्वांचे कोणी ना कोणी मास्टरमाईंड असल्याचे सुरक्षा यंत्रणांना लक्षात आले. हे मास्टरमाईंड त्यांच्या मास्टर प्लॅनप्रमाणे हल्ले घडवत आले. परंतु त्यातल्या फारच थोड्यांना शिक्षा होऊ शकली. कारण, या सगळ्या दहशतवादी मास्टर माइंडना पकडण्यासाठी आवश्यक ते उपाय करता आले नाहीत,ही वस्तुस्थिती मान्य करावीच लागेल !

### हिंसाचार घडवून पळून जायचे..

आतादेखील ज्या राणाला भारतात आणल्याचा गाजावाजा होत आहे. परंतु, त्याला पकडण्यासाठी पंधरा वर्षांचा कालावधी लागला. भारतात हल्ले घडवायचे आणि परदेशात पळून जायचे, हा प्रकार पूर्वीपासूनच चालत आलेला आहे. मुंबईवरच्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा हा राणा मास्टर माइंड असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. पण त्याचा सुगावा आत्ता लागला आणि त्याला अमेरिकेकडून ताब्यात घेण्यात आले.

### दाऊद हा तर दहशतवादाचा म्होरक्या..

मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यांचा इतिहास जर बघितला तर तो कुख्यात दाऊद इब्राहिमपासून सुरू होतो. देशातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील काळ्या साम्राज्याचा तो डॉन..मुंबईत दि. १२ मार्च १९९२ ला त्याने घडवलेले बारा साखळी बॉंबस्फोट हा भारतातला आतापर्यंतचा सर्वात मोठा दहशतवादी कट म्हणता येईल ! भारताविरुद्ध छेडलेले छुपे युद्धच ते ! गेल्या २६/११ प्रमाणेच दाऊदने घडवलेल्या बारा बॉंबस्फोटामागे मात्र जाणीवपूर्वक हिंदू-मुस्लीम दंगे घडवून देशात अस्थिरता निर्माण करण्याचे षडयंत्र होते. अर्थात, २६/११ च्या हल्ल्यात जिवंत सापडलेल्या अजमल कसाबला जवळपास वर्षभरानंतर फाशी दिले गेले, या आठवणी अगदी ताज्या आहेत.

### खटला जलदगती कोर्टात हवा..

आता या राणाविरुद्धचा हा खटला जलदगती कोर्टामध्ये चालला, तरच वर्षभरात त्याला शिक्षा होण्याची शक्यता आहे. अन्यथा, तोपर्यंत त्याला सांभाळण्यात बराच खर्च केला जाईल. विशेष म्हणजे अमेरिकेतून त्याचे प्रत्यार्पण व्हावे, याकरिता गेली दहा वर्ष प्रयत्न चालू होता. त्यांनतर प्रत्यार्पणात यश मिळाले, असे म्हणता येईल.

### भारत दहशतवादाने पोळलेला देश!

वास्तविक, दहशतवादाच्या या आगीमध्ये भारत हा सर्वाधिक पोळलेला देश ठरतो. स्थानिक पातळीवर भारताने हा दहशतवाद संपुष्टात आणण्याच्या दिशेने कठोर पावले उचलली नाहीत, म्हणूनच इतक्या मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले. अगदी अमेरिकेत वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेले हल्ले म्हणजे अमेरिकेच्या सत्ताधिशपणाला सर्वात मोठा धक्का होता. ओसामा बिन लादेनने अतिशय योजनापूर्वक हा हल्ला घडवून आणल्याचे स्पष्ट झाले होते. म्हणजे ज्या अमेरिकेला दहशतवादाचे धक्के बसलेले आहेत, त्या देशानेसुद्धा राणासारख्याच्या दहशतवाद्याचे प्रत्यार्पण करण्यात इतका विलंब लावावा, हे एक आश्चर्यच आहे.

### दाऊदला आणा, कठोर शिक्षा द्या..

त्यामुळे भारताने आता स्वतः कठोर पावले उचलत गेल्या तीस चाळीस वर्षातल्या दहशतवादी हल्ल्यांचा जो खरा सुपर मास्टरमाईंड ठरतो, त्या दाऊद इब्राहिमलाही भारतात आणून शिक्षा केली पाहिजे. अगदी २६/११ च्या हल्ल्यातही दाऊदचा अदृश्य रोल होता. मुंबईतल्या बऱ्याच ठिकाणची रेकी करण्यापासून ते स्थानिक मदत पोहचविण्यापर्यंत दाऊदने भूमिका निभावली होती. उशिरा का होईना,पण राणाचे प्रत्यार्पण करण्यात यश आले असेल, तर याच मुंबईवरील हल्ल्यांचा सुपर मास्टरमाईंड असलेल्या दाऊदचे प्रत्यार्पण आता घडवून आणले पाहिजे. ते जर शक्य होत नसेल तर अमेरिकेने लादेनला ज्याप्रमाणे घुसून मारले, त्याप्रमाणे दाऊदलाही न्याय दिला पाहिजे.

### लोकल माईंडचाही बंदोबस्त करा..

राणासारखा मास्टरमाईंड जरी हाताशी लागला तरी हल्ल्यात स्थानिक पातळीवर मदतीचा हात देणारे लोकल माईंडही आहेत. त्यांचाही बंदोबस्त व्हायला हवा. राजकीय स्तरावर तर या दहशतवादी हल्ल्यांचे फायदे उठवण्याचाही प्रयत्न झाला. मग, अगदी २६/११ च्या हल्ल्याला भगवा दहशतवाद म्हणण्यापासून ते राणाला कायदेशीर ट्रायल मिळाली पाहिजे, अशी सहानुभूती व्यक्त करणारी विधाने राजकारण्यांकडून होऊ लागली आहेत.

### सराईत राजकारणी आणि दहशतवाद

ज्यांनी नेहमीच दहशतवादाचा राजकीय वाद म्हणून वापर केला, काश्मिरमध्ये पोसला गेलेला दहशतवाद हा तर सराईत राजकारण्यांच्या छत्रछायेखाली पोसला गेलेला दहशतवाद होता. अमेरिकेतही कायद्याचेच राज्य आहे. तिथेही लोकशाही आहे. परंतु देशविरोधी कारस्थाने करणाऱ्याला वर्षभरात संपवले जाते. भारतातही कायद्याचे राज्य आहे. त्या संविधानाच्या चौकटीतच या दहशतवादाला दफन करणे अत्यंत गरजेचे ठरते. आता, जर याच्यावर नियंत्रण मिळवणे शक्य होत असेल, तर अजूनही पाकिस्तानमध्ये बसून भारतातल्या अनेक घडामोडींचे सूत्रसंचालन करणाऱ्या सुपर मास्टर माईंडला खेचून आणण्याची वेळ आलेली आहे. जर आता राणासारखा दहशतवादीही पकडला जाऊ शकत असेल, तर गेली अनेक वर्षे भारताला चकवा देणाऱ्या दाऊदचाहो हिशेब चुकता करण्याची हीच योग्यवेळ ठरू शकते. त्यात दाऊद हा लपून बसलेले घराची शहर हे पाकिस्तान म्हणजे दहशतवाद्यांचे आश्रयस्थानच आहे. ते अशा आरोपींचे प्रत्यार्पण करणार नाही, त्यासाठी पाकिस्तानच्या हद्दीत थेट घुसूनच सोक्षमोक्ष लावावा लागेल.. नरेंद्र मोदींना जर आपली प्रतिमा पूर्वीसारखीच आक्रमक ठेवायची असेल, तर दाऊदचा करेक्ट कार्यक्रम करण्याची हीच वेळ आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महिलांना 500 रुपयेच मिळणार?

## 7 लाख 74 हजार 148 महिलांना 500 रुपये सन्मान निधी वितरित

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नमो शेतकरी योजनेअंतर्गत राज्यातील पात्र महिला शेतकऱ्यांना एक हजार रुपये दिले जातात. तर, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत आर्थिक सक्षम नसलेल्या पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. अनेक महिला या दोन्ही योजनेत पात्र असल्याने दोन्ही योजनांचा लाभ घेतला जातोय.**



परिणामी दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये न मिळता ५०० रुपयेच मिळणार आहेत. याबाबत चर्चा सुरू झाल्यानंतर नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजनेतील सामायिक पात्र असलेल्या त्या आठ लाख महिलांनी नाराजी व्यक्त केली. तसंच, विरोधकांनीही यावर टीका केली. आता या चर्चा सुरू असतानाच महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी याबाबत मोठा खुलासा केला आहे. आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट लिहित म्हटलंय की, "दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे.""त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७ लाख ७४ हजार १४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे", असं स्पष्टीकरण आदिती तटकरे यांनी दिलं.एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे किंवा योजनेच्या देदीप्यमान यशाने त्यांचे मनोबल खचले आहे. विरोधकांच्या या अपप्रचाराला माझ्या लाडक्या बहिणी बळी पडणार नाहीत ही मला खात्री आहे", असंही त्या पुढे म्हणाल्या. परिणामी दोन्ही योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये न मिळता ५०० रुपयेच मिळणार आहेत. याबाबत चर्चा सुरू झाल्यानंतर नमो शेतकरी योजना आणि लाडकी बहीण योजनेतील सामायिक पात्र असलेल्या त्या आठ लाख महिलांनी नाराजी व्यक्त केली. तसंच, विरोधकांनीही यावर टीका केली. आता या चर्चा सुरू असतानाच महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी याबाबत मोठा खुलासा केला आहे. आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट लिहित म्हटलंय की, "दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे.००० रुपये लाभ घेत असलेल्या ७ लाख ७४ हजार १४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे.

### अपप्रचाराला बहिणी बळी पडणार?

", असं स्पष्टीकरण आदिती तटकरे यांनी दिलं.एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याबाबतचे स्पष्टीकरण मी स्वतः विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिले असून विधिमंडळाच्या कामकाजात त्याची नोंद आहे. तरीही मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत सातत्याने अपप्रचार करणाऱ्या विरोधकांचे एकतर प्रशासकीय आकलन कच्चे आहे किंवा योजनेच्या देदीप्यमान यशाने त्यांचे मनोबल खचले आहे. विरोधकांच्या या अपप्रचाराला माझ्या लाडक्या बहिणी बळी पडणार नाहीत ही मला खात्री आहे", असंही त्या पुढे म्हणाल्या.

# पंढरीचा पांडुरंग निघाला लंडन वारीला !

## भाविकांकडून पंढरी ते लंडन दिंडी; 18000 किलोमीटरचा प्रवास

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पंढरीची वारी आता थेट साता समुद्रापार जाणार आहे. मूळचे अहिल्यानगरचे पण सध्या लंडन स्थायिक असलेले विठ्ठलभक्त अनिल खेडकर आणि त्यांची दिंडी पंढरपूर येथून थेट लंडनला श्री विठ्ठलाच्या पादुका घेऊन जात आहेत. १४ एप्रिल ते २१ जून या कालावधीत तब्बल २२ देश आणि अठरा हजार किलोमीटरचा प्रवास या अनोख्या दिंडीतून करणार आहेत. या विठ्ठलाच्या पादुकेचे पूजन विठ्ठल मंदिरात करण्यात आले असून, ही अनोखी दिंडी लंडनकडे प्रस्थान ठेवली.**



पंढरी वारीची ख्याती जगभरात पसरली आहे. अनेक अभ्यासक भक्तमंडळी या वारीचा अनुभव घेताना दिसून येतात. आता अहिल्यानगरचे पण सध्या लंडन स्थायिक असलेले खेडकर या भाविकाने विठ्ठलाच्या पादुकांच्या दिंडीचे आयोजन केले आहे. अनिल एकनाथ खेडकर हे भारतात होते त्यावेळेस त्यांनी आळंदी ते पंढरपूर अशी वारी देखील केलेली आहे. त्यावरून लंडन येथे विठ्ठल मंदिर उभे करावे आणि त्या पादुका वारकरी संप्रदायाप्रमाणे दिंडीच्या माध्यमातून आणून त्याची प्राणप्रतिष्ठा करण्याचे खेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठरवले.पंढरपूर येथून लंडन असा प्रवास करताना विविध देश, त्यांच्या विविध परवानगी, पास इत्यादी कायदेशीर मान्यता सहा महिन्यांपासून सुरू होती. यासाठी २२ देशांच्या चारचाकी गाडी प्रवासाच्या सर्व परवानग्या मिळाल्या आहेत. पुढे त्यांनी १४ एप्रिल ते २१ जून हा कालावधी निश्चित केला. रोज किती किलोमीटर प्रवास, मुक्काम यांचे नियोजन केले. अमेरिका, युरोप येथे मराठी मंडळे, इस्कॉन, अक्षरधाम तसेच विविध मंदिरे यांनी सहकार्य केल्याचे खेडकर यांनी सांगितले.१४ एप्रिल रोजी येथील श्री विठ्ठल मंदिरात विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मनोज श्रोत्री, सदस्य उपस्थित होते. टाळ मृदंग आणि हरिनामाच्या जयघोषात ही अनोखी सातासमुद्रापार दिंडीचे मोठ्या उत्साहात प्रस्थान ठेवले आहे. दिंडी लंडन येथे २१ जून रोजी विसावणार आहे. पंढरीचा विठुराया आता लंडनच्या वारीला निघाला, असं म्हणलं तर वावगे ठरणार नाही. वारकरी संप्रदायात एकमेकांच्या पाया पडणे, सर्व समभाव, सलोखा अनुभवला. याचा प्रसार, लाभ हा जगभर व्हावा. वारकरी संप्रदायाचे विचार रूजावेत, अशी इच्छा आहे.

### पंढरीची वारी आता साता समुद्रापार

पंढरीची वारी आता थेट साता समुद्रापार जाणार आहे.विठ्ठलभक्त अनिल खेडकर आणि त्यांची दिंडी पंढरपूर येथून थेट लंडनला श्री विठ्ठलाच्या पादुका घेऊन जात आहेत. १४ एप्रिल ते २१ जून या कालावधीत तब्बल २२ देश आणि अठरा हजार किलोमीटरचा प्रवास या अनोख्या दिंडीतून करणार आहेत.

# रॉबर्ट वाड्राची ईडीकडून चौकशी!

## वाड्रा 15 वेळा ईडीला भेटले; 23,000 कागदपत्रे सादर केली



। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा (56) अंमलबजावणी संचालनालयाच्या (ED) रडारवर आले आहेत. हरियाणाच्या शिकोहेपूर येथील जमीन व्यवहारातील कथित अनियमितताप्रकरणी दुसऱ्यांदा समन्स बजावल्यानंतर आज मंगळवारी (१५ एप्रिल) वाड्रा ईडीच्या कार्यालयात चौकशीसाठी हजर झाले होते. यावेळी ईडीने त्यांची तब्बल सहा तास चौकशी केली , तसेच त्यांना बुधवारी सकाळी ११ वाजता पुन्हा चौकशीसाठी हजर होण्यास सांगण्यात आले आहे.**

वाड्रा यांना यापूर्वी ८ एप्रिल रोजी समन्स बजावण्यात आले होते पण ते चौकशीला हजर राहिले नव्हते, त्यामुळे त्यांना मंगळवारी दुसरे समन्स बजावण्यात आले. "नुकतेच आम्हाला तपासादरम्यान काही नवीन माहिती मिळाली आहे आणि आम्ही त्यांना याबद्दल प्रश्न विचारयचे आहेत. ते ईडीसमोर हजर झाले की एजन्सीकडून प्रीव्हेंशन ऑफ मनी लाँड्रिंग ॲक्ट (पीएमएलए)अंतर्गत त्यांचा जबाब नोंदवला जाईल," असे द इंडियन एक्सप्रेसच्या सूत्रांनी सांगितले.मंगळवारी सकाळी नोटीस मिळाल्यानंतर काही तासांनी वाड्रा हे त्यांच्या समर्थकांसह सुजन सिंग पार्क येथील त्यांच्या निवासस्थानापासून एपीजे अब्दुल कलाम रोडवरील ईडी मुख्यालयापर्यंतचे एक किलोमीटरचे अंतर चालत गेले होते. जवळपास सकाळी १०.४५ वाजता वाड्रा हे त्यांच्या वकिलाबरोबर ईडीच्या कार्यालयात दाखल झाले. दुपारच्या जेवणासाठी वाड्रा यांना दुपारी १.३० वाजता बाहेर सोडण्यात आले होते. यावेळी ईडी कार्यालयाबाहेर पत्रकारांशी बोलताना वाड्रा म्हणाले की, ते तपासात सहकार्य करण्यास तयार आहेत, पण त्यांनी यावेळी हा तपास थांबवण्याची गरज असल्याचे म्हटले. "२००७ मध्ये घडलेल्या घटनेबद्दल तुम्ही कसे बोलू शकता? या प्रकरणात काहीही नाही, त्यांना काहीतरी शोधण्यासाठी २० वर्षे लागणार नाहीत, मी १५ वेळा भेट (ईडीला) दिली आहे आणि २३,००० कागदपत्रे देखील सादर केली आहेत, आता ते पुन्हा तेच २३,००० कागदपत्रे सादर करण्यास सांगत आहेत," असे ते म्हणाले. त्यानंतर वाड्रा हे पुन्हा दुपारी २.२० च्या सुमारास ईडीच्या कार्यालयात परतले. त्यानंतर संध्याकाळी ६.१० च्या सुमारास ते चौकशी संपवून बाहेर आले.ईडीकडून रॉबर्ट वाड्रा यांची चौकशी होत असलेलं हे प्रकरण त्यांच्या स्कायलाईट हॉस्पिटॅलिटी आणि रिअल इस्टेट क्षेत्रातील दिग्गज कंपनी डीएलएफ यांच्यातील एका जमीन व्यवहाराशी संबंधित आहे. २००७ मध्ये रॉबर्ट वाड्रा यांनी केवळ एक लाख रुपयांच्या भांडवलासह ही कंपनी सुरू केली. पुढील वर्षी, २००८ मध्ये या कंपनीने गुरुग्राममधील मानेसर-शिकोहपूर भागात ओंकारेश्वर प्रॉपर्टीजकडून सुमारे साडेतीन एकर जमीन ७.५ कोटी रुपयांना खरेदी केली. खरेदीच्या केवळ दुसऱ्याच दिवशी ही जमीन स्कायलाइट हॉस्पिटॅलिटीच्या नावावर हस्तांतरीत करण्यात आली, म्हणजेच या कंपनीचा मालकी हक्क रॉबर्ट वाड्रा यांच्या कंपनीकडे गेला. साधारणतः ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी किमान तीन महिन्यांचा कालावधी लागतो, पण येथे ती २४ तासांत पूर्ण झाली. एका महिन्यानंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील हरियाणा सरकारने स्कायलाईट हॉस्पिटॅलिटीला बहुतेक जमिनीवर गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्याची परवानगी दिली, ज्यामुळे त्या जमिनीचे बाजारमुल्यात प्रचंड वाढ झाली.


### नेमकं प्रकरण काय आहे?

जून २००८ मध्ये डीएलएफ कंपनीने तीच जमीन ५८ कोटी रुपयांना खरेदी करण्यास सहमती दर्शवली, म्हणजे काही महिन्यांतच वाड्रा यांच्या मालमत्तेची किंमत सुमारे ७०० टक्यांनी वाढली. डीएलएफने वाड्रा यांना काही हप्त्यांमध्ये पैसे दिले आणि २०१२ मध्ये सदरील जमीन कंपनीच्या नावावर केली. हरियाणा केडरचे आयएएस अधिकारी अशोक खेमका यांनी ऑक्टोबर २०१२ मध्ये या जमिनीची हस्तांतरण प्रक्रिया रद्द केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आलं होतं.त्यांना बुधवारी सकाळी ११ वाजता पुन्हा चौकशीसाठी हजर होण्यास सांगण्यात आले आहे. वाड्रा यांना यापूर्वी ८ एप्रिल रोजी समन्स बजावण्यात आले

---

# दंगेखोरांना समजुतीची भाषा कळत नाही

## दंगेखोरांना केवळ काठीचीच भाषा समजते : योगी आदित्यनाथ



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पश्चिम बंगालमध्ये चालू असलेल्या दंगलींबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. एका सभेला संबोधित करताना ते म्हणाले, "लातों के भूत बातों से नहीं मानतो, हे दंगेखोल काठी उगारल्याशिवाय ऐकणार नाहीत."**

उत्तर प्रदेशमधील हरदोई जिल्ह्यातील राजा नरपती सिंह यांच्या स्मृतीस्थळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील अनेक विकासकामांचं लोकार्पण केलं, तसेच अनेक कामांचं भूमिपूजनही केलं. या ठिकाणी आयोजित सभेत बोलताना त्यांनी पश्चिम बंगालमधील हिंसाचारावरही भाष्य केलं. योगी आदित्यनाथ म्हणाले, "२०१७ च्या आधी उत्तर प्रदेश राज्य कसं होतं ते आठवून पाहा. दर दोन-तीन दिवसांनी राज्यातील कुठल्या ना कुठल्या भागात दंगली होत होत्या. काठी हाच या दंगलींवरील उपाय आहे. त्यांना फटके देणं हाच एक उपचार आहे. काठीशिवाय हे दंगेखोर ऐकणार नाहीत. आता तुम्ही पश्चिम बंगालमधील स्थिती पाहतच आहात. राज्यात दंगली होतायत आणि मुख्यमंत्री स्वस्थ बसून आहेत. त्या काहीच बोललेल्या नाहीत."योगी आदित्यनाथ म्हणाले, "पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री दंगेखोरांना शांतीदूत संबोधतात. परंतु, या दंगेखोरांना समजुतीची भाषा कळत नाही. यांना केवळ काठीचीच भाषा समजते. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली तिथल्या सरकारने दंगेखोरांना सूट दिली आहे. त्यामुळे संपूर्ण मुर्शिदाबाद एक आठवड्यापासून जळत आहे आणि सरकारने मौन बळगलं आहे. या अराजकतेवर लगाम लावायला हवा."उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणाले, "बंगालमधील सरकार स्वस्थ बसून असलं तरी तिथलं न्यायालय गंभीर आहे. त्यामुळे मी न्यायालयाचे आभार मानेन. त्यांनी केंद्र सरकारला सांगून राज्यात केंद्रीय सुरक्षा बल तैनात करायला लावलं. तिथल्या हिंदूंना वाचवण्यासाठी, त्यांच्या सुरक्षेसाठी केंद्रीय संरक्षण दल राज्यात तैनात आहे."योगी आदित्यनाथ म्हणाले, "तुम्ही तिथल्या हिंदूंची आपबिती पाहिली, ऐकली असेल. तरीदेखील तिथले सत्ताधारी शांत बसून आहेत. काँग्रेसने व समाजवाद्यांनी देखील मौन बाळगलं आहे. दुसऱ्या बाजूला दंगेखोर गरीब हिंदूंना धमक्यांवर धमक्या देत आहेत. बांगलादेशात जे झालं ते पश्चिम बंगालमध्ये करण्याची धमकी देत आहेत. काहीजण निलाजरेपणाने त्या सगळ्याचं समर्थनही करत आहेत. माझा या सगळ्या लोकांना प्रश्न आहे की तुम्हाला बांगलादेश आवडत असेल.

### लातों के भूत बातों से नहीं मानतो

योगी आदित्यनाथ म्हणाले, "२०१७ च्या आधी उत्तर प्रदेश राज्य कसं होतं ते आठवून पाहा. दर दोन-तीन दिवसांनी राज्यातील कुठल्या ना कुठल्या भागात दंगली होत होत्या. काठी हाच या दंगलींवरील उपाय आहे. त्यांना फटके देणं हाच एक उपचार आहे. काठीशिवाय हे दंगेखोर ऐकणार नाहीत.

# रणदीप हुड्डाने नाकारलेला रंग दे बसंती




ओमप्रकाश मेहरा यांचा २००६ साली प्रदर्शित झालेला 'रंग दे बसंती' हा चित्रपट चांगलाच गाजला. आमिर खान, आर माधवन यांची प्रमुख भूमिका चित्रपटात पाहायला मिळाली. अभिनेता रणदीप हुड्डालादेखील राकेश ओमप्रकाश मेहरा यांनी या चित्रपटासाठी ऑफर दिली होती. मात्र, अभिनेत्याने राम गोपाल वर्मा यांच्या चित्रपटासाठी ही ऑफर नाकारली. आता नुकत्याच एका मुलाखतीत या चित्रपटाची भूमिका नाकारून एक मोठी संधी गमावल्याबद्दल अभिनेत्याने खेद व्यक्त केला आहे.शुभंकर मिश्राच्या पॉडकास्टमध्ये रणदीप हुड्डाने हजेरी लावली होती. यावेळी 'रंग दे बसंती' चित्रपटात काम न करण्याबाबत रणदीप हुड्डा म्हणाला, "रंग दे बसंती चित्रपटात मला भगत सिंगची भूमिका करण्यासाठी विचारले होते, पण मी नकार दिला. त्यानंतर ती भूमिका सिद्धार्थने साकारली. मी जर 'रंग दे बसंती'मध्ये काम केले असते तर मी आता वेगळ्या प्रकारचे काम करीत असतो. मी ऑडिशन दिली होती आणि मला ते आवडले होते. राकेश ओमप्रकाश काहीवेळा माझ्याकडे येत असत. कधी कधी दारू पिऊन गाडी चालवत असत. ते मला म्हणायचे की, तू चित्रपटात काम कर."रणदीप हुड्डा पुढे म्हणाला, "मला रंग दे बसंती चित्रपटात काम करायचे होते, त्यावेळी इंडस्ट्रीमध्ये माझे दोनच ओळखीचे लोक होते. एक माझी गर्लफ्रेंड आणि दुसरे रणदीप हुड्डा होते. माझ्या गर्लफ्रेंडने मला सांगितले की तू कोणतीही छोटी भूमिका करू नको. त्याचदरम्यान राम गोपाल वर्मा मला म्हणाले की मी तुला डी या चित्रपटात प्रमुख कास्ट करण्याचा विचार करत आहे. पोस्टरमध्ये तू आमिर खानच्या मागे उभा राहशील असे त्यांनी मला सांगितले. जाट लोकांना जसा पटकन राग येतो, तसा मला राग आला. अहंकार बाहेर आला.

# अपूर्वाचा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर!

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री तारा सुतारिया (TARA SUTARIA) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. चित्रपट निर्माता करण जोहरच्या 'स्टुडंट ऑफ द इयर 2' या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणाऱ्या ताराने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. ताराचा 'अपूर्वा' (APURVA) हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. तिच्या या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील ताराच्या अभिनयाचं सध्या अनेकजण कौतुक करत आहेत. तारा सुतारिया ही 'अपूर्वा' या थ्रिलर चित्रपटाद्वारे ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करणार आहे. 'अपूर्व' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. या ओटीटी प्लॅटफॉर्मच्या चॅनेलवर 'अपूर्व' चित्रपटाचा ट्रेलर शेअर करण्यात आला आहे. ट्रेलरमध्ये दाखवण्यात आलं आहे की, अपूर्वा नावाच्या तरुणीचे लग्न सिद्धार्थ नावाच्या मुलाशी होणार आहे. अपूर्वा आणि सिद्धार्थ यांच्या लग्नाची तयारी सुरु असते अशातच काही गुंड अपूर्वाचे अपहरण करतात. या गुंडांच्या तावडीतून आपला जीव वाचवण्यासाठी अपूर्वा धडपड करते. 'अपूर्वा' या चित्रपटात तारा सुतारियासोबतच अभिषेक बॅनर्जी, राजपाल यादव आणि धैर्य करवा या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. 'अपूर्वा' हा चित्रपट 15 नोव्हेंबर रोजी रिलीज होणार आहे. हा चित्रपट या ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होणार आहे. काही दिवसांपूर्वी 'अपूर्वा' या चित्रपटाचा टीझर देखील रिलीज झाला होता. या टीझरला देखील नेटकऱ्यांची पसंती मिळाली होती. तारा सुतारियाचा गेल्या वर्षी 'एक व्हिलन रिटर्न्स' हा चित्रपट रिलीज झाला होता. जॉन अब्राहम (JOHN ABRAHAM), अर्जुन कपूर, आणि दिशा पाटनी यांनी देखील या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारली होती. या चित्रपटानंतर तारा सुतारियाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत होते. तारा सुतारिया ही सोशल मीडियावर देखील ॲक्टिव असते. इन्स्टाग्रामवर तिचे 8.8 मिलियन फॉलोवर्स आहेत.



# रणवीर बॉयफ्रेंड होऊ शकत नाही

टीव्हीवर दिसणाऱ्या अथवा मोठ्या पडद्यावर दिसणाऱ्या अनेक कलाकारांना पाहिल्यानंतर, स्क्रीनवर दिसणारे त्यांच्यातील बॉण्डिंग पाहिल्यानंतर ते कलाकार खऱ्या आयुष्यातसुद्धा एकत्र असावेत, असे चाहत्यांना वाटत असते. रणवीर सिंह आणि अनुष्का शर्मा ही जोडी अशाच ऑनस्क्रीन जोड्यांपैकी एक आहे. अनुष्का रणवीर सिंह यांनी मनीष शर्माच्या 'बँड बाजा बारात' या चित्रपटात पहिल्यांदा एकत्र काम केले. या चित्रपटाद्वारे रणवीर सिंहने बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. 'बँड बाजा बारात'ला मोठे यश मिळाले होते. त्यानंतर त्यांनी दिल धडकने दो या चित्रपटातही एकत्र काम केले होते. त्यांची ऑफस्क्रीन मैत्रीदेखील उत्तम आहे. एका जुन्या मुलाखतीत अनुष्काने कधीच रणवीर सिंहला का डेट केले नाही, याबद्दल खुलासा केला होता. बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्माने २०११ साली एनडीटीव्हीला मुलाखत दिली होती. त्या मुलाखतीत अनुष्काने रणवीर सिंह बॉयफ्रेंड असू शकत नाही, असे म्हटले होते. त्या मुलाखतीत अनुष्काला असेही विचारले गेले होते की, रणवीर असं का म्हणाला होता की, तो गर्लफ्रेंड म्हणून तुला सांभाळू शकणार नाही.

# रडत पळत गेली सुश्मिता सेन

बॉलीवूड चित्रपटांमध्ये इंटिमेट सीन्स व बोल्ड सीन असतात. अशा सीनचे शूटिंग खूप काळजीपूर्वक व कमी लोकांच्या उपस्थितीत केले जाते. काही वेळा अशा सीन्सचे शूटिंग करताना अनेक अडचणी येतात. अभिनेत्रींना किंवा अभिनेत्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. काही वेळा अभिनेत्रींबरोबर इंटिमेट सीन करताना सहकलाकार नियंत्रण गमावतात. एका चित्रपटातील इंटिमेट सीनच्या शूटिंगदरम्यान मिथुन आणि सुश्मिता सेन यांच्यात गैरसमज निर्माण झाला होता. सीनच्या शूटिंगनंतर सुश्मिता रडत पळाली होती. नेमकं काय घडलेलं ते जाणून घेऊयात.सुश्मिता सेनने मिथुन चक्रवर्तीबरोबर २००६ मध्ये 'चिंगारी' या चित्रपटात काम केलं.



# बॉलीवूड अभिनेत्रीचं फिल्मी आयुष्य

अनेक बॉलीवूड अभिनेत्रींनी घटस्फोटित अभिनेत्यांशी, खेळाडूंशी लग्न केले आहे. अशीच एक अभिनेत्री व माजी 'मिस युनिव्हर्स' तिच्या अफेअर्स व लग्नामुळे चर्चेत राहिली. या अभिनेत्रीचं नाव लारा दत्ता. इंडस्ट्रीत दोन दशकांपेक्षा जास्त काळापासून सक्रिय असलेल्या लाराच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल जाणून घेऊयात. २००३ मध्ये रिलीज झालेल्या 'अंदाज' या चित्रपटातून लाराने बॉलीवूडमधील करिअरला सुरुवात केली होती. या चित्रपटात प्रियांका चोप्रा व अक्षय कुमार यांच्या मुख्य भूमिका होत्या. चित्रपटातील लाराच्या सौंदर्याने चाहत्यांना भुरळ घातली होती. लारा तिच्या चित्रपटांपेक्षा अफेअर्समुळेही राहिली. ती तिच्या बॉयफ्रेंडबरोबर जवळपास ९ वर्षे लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये होती. या नात्याचा तिच्या करिअरवरही बराच परिणाम झाला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, महेश भूपतीशी लग्न करण्यापूर्वी लाराचं केली दोरजीबरोबर अफेअर होतं. केली हा मॉडेल असून दोघे ९ वर्षे नात्यात होते. त्यांचं नातं जगजाहीर होतं, त्यामुळे ते लग्न करतील, असं वाटत होतं. पण, अचानक त्यांच्या ब्रेकअपची बातमी आली. अभिनेता डिनो मोरिया हे नातं तुटण्यास कारणीभूत असल्याचं म्हटलं जातं. केलीला लारा व डिनोचं अफेअर असल्याची शंका होती, त्यामुळे ब्रेकअप झालं असं बोललं जातं.केलीपासून वेगळी झालेली लारा नंतर भारतीय टेनिसपटूच्या प्रेमात पडली. तिने महेश भूपतीशी १६ फेब्रुवारी २०११ रोजी लग्नगाठ बांधली.

# चिंधड्या विसरून पंजाबची कमाल!

## 245 धावा करूनही पराभूत संघाने केला 111 धावांचा यशस्वी बचाव

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**१२ एप्रिल २०२५ रोजी पंजाब किंग्ज संघाला मानहानीकारक पराभवाला सामोरं जावं लागलं होतं. हैदराबाद इथे झालेल्या लढतीत पंजाबने २४५ धावांचा डोंगर उभारला. मात्र अवघ्या दीड तासात हैदराबादने पंजाबच्या गोलंदाजीच्या चिंधड्या उडवत अशक्यप्राय विजय मिळवला. हैदराबादने ९ चेंडू आणि ८ विकेट्स राखून अविश्वसनीय विजय मिळवला. एवढ्या धावा करूनही पराभव पदरी पडल्यामुळे पंजाबवर जोरदार टीका झाली.**

अर्शदीप सिंगने ४ षटकात ३७ धावा दिल्या तर चहलच्या ४ षटकात हैदराबादने ५६ धावा लुटल्या होत्या. मार्को यान्सनच्या २ षटकातच ३९ धावांची लूट झाली. यश ठाकूर आणि ग्लेन मॅक्सवेल यांनाही ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांच्या बॅटचा तडाखा बसला होता. शशांक सिंगच्या २ षटकात हैदराबादच्या जोडगोळीने २७ धावा चोपून काढल्या. पंजाबच्या एकाही गोलंदाजाला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नव्हती. तीन दिवसात घरी परतल्यावर पंजाबच्या गोलंदाजांनी आदर्श गोलंदाजीचा वस्तुपाठच सादर केला.१५ एप्रिल २०१५. मुल्लापूर अर्थात मिनी चंदीगढ इथे झालेल्या लढतीत पंजाबचा घरच्या मैदानावर १११ धावात खुर्दा उडाला. घरच्या मैदानावर अशी शोभा झालेल्या पंजाबने हार मानली नाही. शिस्तबद्ध आणि भेदक गोलंदाजी करत पंजाबने आयपीएल स्पर्धेतल्या सगळ्यात कमी धावसंख्येचा यशस्वी बचाव केला. चहलने ४ षटकात २८ धावांत ४ विकेट्स घेतल्या. मार्को यान्सनने अवघ्या १७ धावात कोलकाताच्या तिघांना माघारी धाडलं. धोकादायक आंद्रे रसेलला त्रिफळाचीत करत यान्सनने पंजाबच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. अर्शदीपने टिच्चून मारा करताना ३ षटकात अवघ्या ११ धावा देत एक विकेट मिळवली. ग्लेन मॅक्सवेलने वेंकटेश अय्यरला बाद करत कोलकाताच्या डावाला खिंडार पाडलं. एकहाती सामना फिरवणाऱ्या क्विंटन डी कॉकला तंबूत परतावत झेव्हियर



बार्टलेटने पंजाबला उत्तम सुरुवात करून दिली.१७ हंगाम खेळूनही पंजाबला आयपीएल स्पर्धेचं जेतेपद पटकावता आलेलं नाही. यंदा मात्र रिकी पॉन्टिंग यांच्या नेतृत्वात पंजाबने कात टाकायला घेतली आहे.
लिलावात २६.७५ कोटी रुपये खर्चून त्यांनी श्रेयस अय्यरला ताफ्यात घेतलं आणि कर्णधार केलं. कोलकाताला विजय मिळवून देणाऱ्या कर्णधाराला त्यांनी आपलंसं केलं. अर्शदीप सिंग आणि युझवेंद्र चहल या गोलंदाजांसाठी त्यांनी ३६ कोटी रुपये मोजले. या दोघांनीही मंगळवारी आपली उपयोगिता सिद्ध केली.हैदराबादविरुद्ध ४ चेंडूत ४ षटकार लगावणाऱ्या मार्कस स्टॉइनसला पंजाबने विश्रांती दिली. हैदराबादविरुद्ध पंजाबचा प्रमुख गोलंदाज लॉकी फर्ग्युसन दुखापचग्रस्त झाला. लॉकी उर्वरित हंगामात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं. यामुळे पंजाबने झेव्हियर बार्टलेटला संधी दिली. बार्टलेटने पहिल्याच लढतीत आपल्या नैपुण्याची चुणूक दाखवली. प्रशिक्षक रिकी पॉन्टिंग यांनी पंजाबचे डावपेच सांगितले. अर्शदीप सिंग आणि मार्को यान्सन नवा चेंडू हाताळतात पण खेळपट्टीचा नूर लक्षात घेऊन आम्ही झेव्हियर आणि यान्सनकडे नवा चेंडू दिला. अर्शदीपला नंतरच्या षटकांसाठी राखून ठेवलं.पंजाबला प्रियांश आर्यच्या रुपात युवा तडफदार सलामीवीर मिळाला आहे. श्रेयस अय्यर सातत्याने धावा करतोच आहे. नेहल वढेराने आपली उपयुक्तता वारंवार सिद्ध केली. फलंदाजीत अपयशी ठरत असला तरी ग्लेन मॅक्सवेल गोलंदाजीत संघाच्या विजयात योगदान देतो आहे. शशांक सिंगने फिनिशर म्हणून स्वत:ला सिद्ध केलं आहे. इतकी वर्ष सातत्याने जेतेपदापासून दूर राहिल्यानंतर संघाला प्रेरित करणं कठीण आहे पण श्रेयस-पॉन्टिंग जोडी पंजाबसाठी किमयागार ठरू शकते असं भाकीत अनेक माजी खेळाडूंनी वर्तवलं होतं. मंगळवारचा विजय हा त्याचं द्योतक म्हणावं लागेल. १११ धावा केल्यानंतर एखाद्या संघाने विजयाची शक्यता सोडून दिली असती.अर्शदीप सिंगने ४ षटकात ३७ धावा दिल्या तर चहलच्या ४ षटकात हैदराबादने ५६ धावा लुटल्या होत्या. मार्को यान्सनच्या २ षटकातच ३९ धावांची लूट झाली. यश ठाकूर आणि ग्लेन मॅक्सवेल यांनाही ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांच्या बॅटचा तडाखा बसला होता.

### पंजाब किंग्सने इतिहास घडवला

शशांक सिंगच्या २ षटकात हैदराबादच्या जोडगोळीने २७ धावा चोपून काढल्या. पंजाबच्या एकाही गोलंदाजाला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नव्हती. तीन दिवसात घरी परतल्यावर पंजाबच्या गोलंदाजांनी आदर्श गोलंदाजीचा वस्तुपाठच सादर केला.१५ एप्रिल २०१५. मुल्लापूर अर्थात मिनी चंदीगढ इथे झालेल्या लढतीत पंजाबचा घरच्या मैदानावर १११ धावात खुर्दा उडाला. अर्शदीप सिंगने ४ षटकात ३७ धावा दिल्या तर चहलच्या ४ षटकात हैदराबादने ५६ धावा लुटल्या होत्या. मार्को यान्सनच्या २ षटकातच ३९ धावांची लूट झाली. यश ठाकूर आणि ग्लेन मॅक्सवेल यांनाही ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांच्या बॅटचा तडाखा बसला होता. शशांक सिंगच्या २ षटकात हैदराबादच्या जोडगोळीने २७ धावा चोपून काढल्या. पंजाबच्या एकाही गोलंदाजाला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नव्हती.

# रोहितला वानखेडेमध्ये हक्काचं स्थान!

## वानखेडे स्टेडियममधील स्टॅन्डला रोहित शर्मालाचं नाव

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आयपीएल २०२५ सुरू असताना काही दिवसांपूर्वी माहिती समोर आली होती की, वानखेडे स्टेडियममधील एक स्टॅन्डला रोहित शर्माचं नाव देण्याचा प्रस्ताव एमसीए समोर ठेवण्यात आला होता. आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने बैठकित याबाबत मोठा निर्णय घेतला आहे. आता वानखेडे स्टेडियममधील एका स्टॅन्डला रोहित शर्माचं नाव देण्यात आलं आहे.**




वानखेडे स्टेडियममधील एका स्टॅन्डला रोहित शर्माचं नाव देण्याबाबत एमसीएने हिरवा कंदील दिला आहे. वानखेडे स्टेडियमच्या स्टँड्सना रोहित शर्मा, अजित वाडेकर आणि शरद पवार यांची नावे देण्यात आली आहेत. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) मंगळवारी वानखेडे स्टेडियमच्या तीन स्टँडची नावे बदलली.एका वर्षाच्या आत भारताला टी-२० विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफी दोन्ही जेतेपद मिळवून देण्याच्या असाधारण कामगिरीनंतर कर्णधार रोहित शर्माचं स्टॅन्डला नाव देण्याची मागणी समोर आली.
आयपीएलमधील मुंबई इंडियन्सचा कर्णधार म्हणून त्याने प्रचंड यश मिळवले आहे, त्याने फ्रँचायझीला विक्रमी पाच आयपीएल जेतेपद मिळवून दिली आहेत. रोहित जेव्हा जेव्हा मैदानावर उतरतो तेव्हा वानखेडे स्टँडमधून "मुंबईचा राजा" चे जयघोष वारंवार ऐकू येतात. आता रोहित शर्माच्या नावाचं स्टॅन्ड झाल्यानंतर वानखेडेच्या मैदानावरील भारताचे आणि आयपीएल सामने पाहण्याची मजा काही और असेल.दिवेचा पॅव्हेलियनच्या लेव्हल-३ ला आता "रोहित शर्मा स्टँड" असे नाव देण्यात येईल. ग्रँड स्टँडचा लेव्हल-३ "शरद पवार स्टँड" म्हणून ओळखला जाईल. ग्रँड स्टँडचा लेव्हल-४ "अजित वाडेकर स्टँड" म्हणून ओळखला जाईल. मुंबई क्रिकेटला पुढे नेण्यात या तिन्ही दिग्गजांनी मोठे योगदान दिले आहे.अजित वाडेकर भारताचे माजी कर्णधार होते, ज्यांनी १९७१ मध्ये वेस्ट इंडिज आणि इंग्लंडमध्ये भारताला पहिल्या कसोटी मालिका जिंकण्यात मोठी भूमिका बजावली आणि ३७ कसोटी सामने खेळले. शरद पवार हे बीसीसीआयचे माजी अध्यक्ष आणि आयसीसीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेटने नवीन उंची गाठली.

### ग्रँड स्टँडचा लेव्हल-3

एमसीएच्या या निर्णयानंतर एमसीएचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले, "हे निर्णय मुंबई क्रिकेटच्या आधारस्तंभांबद्दलचा आमचा आदर आणि भविष्यात अधिकाधिक ताकदीने पुढे जाण्याची आमची वचनबद्धता दर्शवतात. सर्वात प्रतिष्ठित मैदानांपैकी एक आहे, जिथे २०११ च्या विश्वचषक अंतिम सामन्यासारखे ऐतिहासिक सामने खेळले गेले आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
। दि. 16 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
प्रज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः
"यत् भावो – तत् भवति"
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

**PRIYADARSHANI**
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's

SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE

Powered by JAI HIND EDUTECH

CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012

BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)




ADMISSION OPEN 2025-2026

Pre Primary to Class XII

LIMITED SEATS
Hurry up!!!

Bi-focal / Technical / Vocational Subject are available

For Science Stream
- Computer Science
- Crop Science
- Electronics
- Mechanical / Technical Automobile
- Information Technology (IT)

For Commerce Stream
- Banking
- Marketing & Sales
- Office Management
- Small Industries & Self employment
- Information Technology (IT)

CALL NOW : 9763441639 / 8657473241

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com